महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.३४८/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ३५२ दि. ०३/०९/२०११

विषय : विधानपरिषदेच्या पदवीधर मतदारसंघाच्या तसेच शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या दिवशी संबंधित मतदारसंघाचे मतदारांना विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्याबाबत.

संदर्भ : सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.-विनैर-२०११/प्र.क्र.१४६/का-२९ दि.२३.०६.२०११.

......

कार्यासन अधिकारी, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०११/प्र.क्र.३५४/ऊर्जा-२ दि.२५.०७.२०११ च्या पत्रासोबत प्राप्त झालेल्या अवर सचिव, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचा शासन निर्णय क्र.-विनैर-२०११/प्र.क्र.१४६/का-२९ दि.२३.०६.२०११ ची प्रत सोबत जोडली आहे.

२. सदर शासन निर्णयान्वये महाराष्ट्र विधान परिषदेच्या पदवीधर मतदार संघातील तसेच शिक्षक मतदार संघातील मतदार असलेल्या कर्मचाऱ्यांना संबंधीत मतदार संघाच्या निवडणूकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजाविण्यासाठी त्या दिवसाची विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्यात आली आहे. तसेच सदर रजा ही कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या नैमित्तिक रजेव्यतिरिक्त असेल असेही नमूद केले आहे. सदर रजा महावितरण कंपनीतील पदवीधर कर्मचाऱ्यांनासुध्दा मंजूर करण्याचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

३. प्रशासकीय परिपत्रक क्र.१ दि.२९.०९.२००५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार व्यवस्थापकीय संचालक यांनी दिलेल्या मंजुरीनुसार महाराष्ट्र विधान परिषदेच्या पदवीधर मतदार संघातील तसेच शिक्षक मतदार संघातील महावितरण कंपनीतील पदवीधर कर्मचाऱ्यांना संबंधित मतदार संघाच्या निवडणूकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्याकरिता विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्यात यावी. सदर रजा कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या नैमित्तिक रजेव्यतिरीक्त असेल.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक निर्गमित केलेल्या दिनांकापासून अंमलात येईल.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

सहपत्र : वरीलप्रमाणे.

(विजय भि. बागुल) 3/9/2011
**मुख्य महाव्यवस्थापक (क)**

*D:\O&M\Adm Cir.F.N.348.doc*
*12/8/2011*

**महाराष्ट्र शासन**

क्र. -संकीर्ण-२०११/प्र.क्र.३५४/ऊर्जा-२,
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
दिनांक :२५ जूलै,२०११.

प्रति,

**व्यवस्थापकीय संचालक,**
महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित,
प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**व्यवस्थापकीय संचालक,**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**व्यवस्थापकीय संचालक,**
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित,
प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**सचिव,**
महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग,
कफ परेड, कुलाबा, मुंबई.

**मुख्य अभियंता (विद्युत),**
सार्वजनिक बांधकाम विभाग,प्रशासकीय इमारत,
रामकृष्ण चेंबूरकर मार्ग,चेंबूर (पूर्व),
मुंबई ४०० ०७१.

विषय – विधानपरिषदेच्या पदवीधर मतदारसंघाच्या तसेच शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या दिवशी संबंधित मतदारसंघाचे मतदारांना विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्याबाबत.

उपरोक्त विषयावरील अवर सचिव,सामान्य प्रशासन विभाग यांच्या दिनांक २३ जून, २०११ च्या पत्राची प्रत सोबत माहिती व अनुपालनासाठी पाठविण्यात येत आहे. अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांच्या निदेशानुसार आपल्या आधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयांना आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात, ही विनंती.

(ल. ना. सदाफुले)
कार्यासन अधिकारी

C.G.M. (T/E)
G.M. (Estt.)
G.M. (F)
Dy. G.M. (Insp.)
Dy. E.E. (HRD)

MGR (DC)
MGR (O&M)
DY. MGR (PACE)

D:\All MERC.doc

विधानपरिषदेच्या पदवीधर मतदारसंघाच्या तसेच शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकाच्या दिवशी संबंधित मतदारसंघाचे मतदारांना विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक - विनैर २०११/प्र.क्र.१४६/का-२९
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
दिनांक- २३ जून,२०११

प्रस्तावना :-

महाराष्ट्र विधानमंडळाच्या विधानपरिषदेतील काही सदस्य पदवीधर मतदारसंघातून तसेच शिक्षक मतदारसंघातून निर्वाचित करण्यात येतात. पदवीधर मतदारसंघ/शिक्षक मतदारसंघामध्ये मतदार असलेल्या कर्मचा-यांना संबंधित मतदारासंघाच्या निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी रजा मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यासंदर्भात सर्वकष विचार करून पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय -**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या पदवीधर मतदारसंघातील तसेच शिक्षक मतदारसंघातील मतदार असलेल्या कर्मचा-यांना संबंधित मतदारासंघाच्या निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी त्या दिवसाची विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्यात यावी. सदर रजा ही कर्मचा-यांना अनुज्ञेय असलेल्या नैमित्तिक रजे व्यतिरिक्त असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

( भा.र.गावित )
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
राज्यपाल यांचे परिवार प्रबंधक,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/ उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,
मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
मंत्रालयीन विभागांतील सर्व सचिव, प्रधान सचिव व अपर मुख्य सचिव,